वाचले :- शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील शासन आदेश क्र.संस्वअ २०११/प्र.क्र२९५/पापु-१६, दि. २ डिसेंबर २०११

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा
क्र.सशा/पसह/कावि/७८२/२०१२
दि. २१/६/२०१२

**विषय :- जिल्हास्तरीय कार्यालय स्वच्छता व्यवस्थापन व सनियंत्रण समिती गठीत करणेबाबत.**

**<u>आदेश</u>**

सर्व जिल्हयातील शासकीय कार्यालयांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी/ कर्मचारी यांच्या संख्येनुसार व शासकिय कार्यालयात येणारे अभ्यांगत लक्षात घेवून पुरुष/ महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या सुविधा उपलब्ध करणे, कार्यरत असलेल्या स्वच्छतागृहांमध्ये सुधारणा करणे त्याची देखभाल व दुरुस्ती करणे यावर सनियंत्रणासाठी खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय कार्यालय स्वच्छता व्यवस्थापन व सनियंत्रण समिती गठीत करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे | सह अध्यक्ष |
| ३ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

सहीxxx
**(विकास देशमुख)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :-

१) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) तथा सदस्य सचिव,
जिल्हा परिषद, पुणे

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेले असून सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे.तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

///

२) स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, वित्त, नियोजन व उर्जा तथा पालकमंत्री पुणे जिल्हा, मंत्रालय,मुंबई-३२

२/-सदर समिती या आदेशान्वये गठीत केली बाबत मा.मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, सहकार, संसदीय कार्य विभाग तथा संपर्कमंत्री पुणे जिल्हा, मंत्रालय, मुंबई-३२

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केली बाबत मा.मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

४) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे करीता